सन २०१३-१४ ऊस गाळप हंगामाचा आढावा आणि सन २०१४-१५ गळीत हंगामाचे धोरण ठरविणेसाठी मा.मंत्री समितीच्या दि.३१.०७.२०१४ च्या बैठकीचे संक्षिप्त इतिवृत्त.

विषय	मुद्दा	मा.मुख्यमंत्र्यांचे निर्देश	संबंधित विभाग	अंमलबजावणीस अपेक्षित कालावधी
१	गाळप हंगाम सन २०१४-१५ सुरु करण्याच्या दिनांकाबाबत	गाळपासाठी अंदाजीत उपलब्ध ऊस ७७० लाख मे.टन, अपेक्षित साखर उतारा ११.४०% व अपेक्षित साखर उत्पादन ८८.०० लाख मे.टन. गाळप हंगाम दिनांक १५ ऑक्टोबर, २०१४ पासून सुरु करावा. तसेच १६० दिवस किंवा ऊसाचे संपूर्ण गाळप होईपर्यंत गाळप परवाना देण्यात यावा.	साखर आयुक्तालय	१५ ऑक्टोबर २०१४ ते संपूर्ण गाळप हंगाम.
२	गाळप हंगाम २०१४-१५ ऊसदराबाबत	हंगाम सन २०१४-१५ साठी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या एफ.आर.पी. दराप्रमाणे- उतारा ९.५०% साठी रु.२२००/- प्र.मे.ट. आणि पुढील १% साठी रु.२३२/- प्रमेट किमान ऊस दर देणे बंधनकारक राहील. तसेच महाराष्ट्र (कारखान्यांना पुरवण्यात आलेल्या) ऊसदराचे विनियमन अधिनियम, २०१३ मधील तरतुदी लागू झालेनंतर त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.	साखर कारखाने/ वित्तीय संस्था आणि बँक	संपुर्ण गाळप हंगाम
३	गाळप हंगाम २०१४-१५ सुरु करणेस्तव बिगर हंगामातील खर्चासाठी अल्पमुदत कर्जासाठी शासकीय थकहमी धोरणाबाबत	नक्त मूल्य उणे असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना गाळप हंगाम २०१४-१५ मध्ये पुर्वहंगामी कर्जासाठी शासकीय थकहमी देणेबाबत शासन स्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल. सदर थकहमीसाठी राज्य साखर विकास निधी स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर करावा.	सहकार विभाग / साखर आयुक्तालय/ सहकारी साखर कारखाने / महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सह.बँका	संपुर्ण गाळप हंगाम
४	हंगाम २०१३-१४ साठी ऊसाचे अंतिम ऊसदर निश्चितीबाबत	प्रस्तावात नमूद सर्व वैधानिक तरतूदी पुर्ण झाल्याची खात्री करुन साखर आयुक्त यांनी सहकारी साखर कारखान्यांच्या अंतिम ऊसदर प्रस्तावांना मान्यता द्यावी.	साखर आयुक्तालय	गाळप हंगाम २०१३-१४ साठी
५	साखर व उपपदार्थ मुल्यांकन	➢ दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर शिल्लक साखर तसेच उपपदार्थ साठ्याचे मुल्यांकन अकौंटींग स्टॅण्डर्ड (२) मधील निकषाप्रमाणे करण्यात यावे. ➢ शिल्लक नियंत्रित साखर साठ्याचे मुल्यांकन केंद्रशासनाच्या दराप्रमाणे करण्यात यावे. ➢ निर्यात साखरेचे मुल्यांकन साखर निर्यात करारातील दराप्रमाणे करण्यात यावे.	सहकारी साखर कारखाने आणि साखर आयुक्तालय	आर्थिक वर्ष २०१३-१४ आणि यापुढील हंगामासाठी .

		➢ या पुढच्या कालावधीत साखर कारखान्यांनी शिल्लक साखर व उपपदार्थ साठ्याचे मुल्यांकन अकौंटींग स्टॅण्डर्ड-२ प्रमाणेच करावे.		
६	ऊस बिलातून करावयाच्या कपातीबाबत	नवीन प्रकल्पासाठी ठेवी कपातीपूर्वी पुढील अटी शर्तीचे पालन आवश्यक. ➢ मान्यता प्राप्त संस्थेकडून डी.पी.आर.आवश्यक आहे. ➢ आयुक्तालयाची आर्थिक व प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. ➢ डी.पी.आर.मध्ये दर्शविलेल्या स्वभांडवला-इतकीच कपात करावी. ➢ कर्ज उभारणी मर्यादा शिल्लक असावी. ➢ सभासदांच्या भाग रक्कमेइतकी सक्तीची कपात पूर्ण झाल्याने प्रकल्प उभारणीसाठी ठेवीची कपात करण्यात यावी. ➢ सदर ठेवीवर व्याजाची तरतूद ताळेबंदास करावी. ➢ कपातीसाठी सर्वसाधारण सभेची पूर्वमान्यता आवश्यकता आहे.	सहकारी साखर कारखाने आणि साखर आयुक्तालय	संपुर्ण गाळप हंगाम २०१४-१५
७	सभासदांच्या ऊस बिलातून ऐच्छिक ठेवीच्या कपातीबाबत	७-अ) नवीन प्रकल्पाकरीता वित्तीय संस्थांच्या कर्जाऐवजी नवीन ठेवी स्विकारणे. ➢ कपात केलेल्या ठेवीची स्वतंत्रपणे गुंतवणुक आवश्यक आहे. ➢ जुन्या ठेवी मुदतीत परत करणे आवश्यक आहे. ➢ ठेवीचे नियम तयार करावे. ➢ सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता आवश्यक आहे. ➢ ठेवीदाराने मुदतपुर्व ठेवीची मागणी केल्यास परतफेड बंधनकारक आहे.	सहकारी साखर कारखाने आणि साखर आयुक्तालय	संपुर्ण गाळप हंगाम २०१४-१५
		७-ब) नविन प्रकल्पाकरिता ऊस बिलातून यापूर्वी कपात केलेल्या ठेवीस मुदतवाढ देणे. ➢ ठेवीवर पूर्णत: व मुदतीत व्याज दिलेले असावे. ➢ ठेवीची मुदत प्रकल्प अहवालात दर्शविलेल्या मुदतीपेक्षा जास्त नसावी. ➢ मुदतवाढीकरीता सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. ➢ मुदतवाढीसाठी साखर आयुक्तालयाची मान्यता आवश्यक आहे.	सहकारी साखर कारखाने आणि साखर आयुक्तालय	संपुर्ण गाळप हंगाम २०१४-१५

८	साखर कारखाना स्तरावर कपात करावयाचा निधी हंगाम २०१४-१५	➢ मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रतिमेटन रु.२/- प्रमाणे. ➢ वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट निधी रु.१/- प्रतिक्विंटल साखर उत्पादन. ➢ महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ वर्गणी :- १. उत्पादनातील कारखान्यांना रु.१/- प्रतिक्विंटल. २. भाडे/भागिदारी तत्त्वावरील कारखाने ७० पैसे प्रतिक्विंटल. ३. अत्यल्प उत्पादन / अनुत्पादित कारखाने रु.१५०००/- ➢ कामगारांची देणी भागविण्यासाठी साखर विक्रीतून रु.५०/- प्रतिक्विंटल कपात. ➢ शासन निर्णयाच्या अधिन राहून भागविकास निधी ऊसदराच्या कमाल ५% मर्यादेपर्यन्त कपात. वरील प्रमाणे कपाती करण्यास मान्यता देण्यात आली.	सहकारी साखर कारखाने आणि साखर आयुक्तालय	संपुर्ण गाळप हंगाम २०१४-१५
९	ऊस पिकासाठी ठिबक सिंचन योजना	राज्यातील ऊसाखालील क्षेत्र पुढील ३ वर्षात १००% ठिबक सिंचनाखाली येण्यासाठी अस्तित्वात असलेली अनुदान योजना आणि त्यामधील उपलब्ध अनुदान निधी अपुरा असल्याने आर.आय.डी.एफ. योजने अंतर्गत निधी/कर्ज उपलब्ध करुन घेण्यासाठी कृषि विभागाने प्रस्ताव तयार करुन पाठपुरावा करावा. याबाबत आवश्यक ती सर्व माहिती साखर संघाने कृषि विभागाला पुरवावी.	कृषि विभाग / साखर आयुक्तालय/ साखर संघ	आर्थिक वर्ष २०१४-१५
१०	शासकीय व इतर कर्जाच्या परतफेडीसाठी उत्पन्नातून तरतूदी	➢ हंगाम सन २००२-०३ मधील ओ.एम.बी. कर्जाच्या देय होणाऱ्या हप्त्याच्या परतफेडीसाठी तरतूद करण्यात यावी. ➢ केंद्र शासनाची अर्थसहाय्य योजना २००७ (Excise Loan) संपूर्ण परतफेडीसाठी तरतूद करावी. ➢ पुनर्ररचना झालेल्या मुदतकर्जाची (नाबार्ड पॅकेज) परतफेडीसाठी तरतूद करावी. ➢ इतर सर्व वैधानिक परतफेडीसाठी आर्थिकपत्रकात तरतूद आवश्यक राहील.	सहकार विभाग/ साखर आयुक्तालय/ सहकारी साखर कारखाने आणि वित्तीय संस्था / बँका	संपुर्ण गाळप हंगाम
११	शासकीय येणेबाकीच्या वसूली बाबत	शासकीय भागभांडवल, कर्ज व हमीशुल्क वसूलीसाठी टॅगिंगद्वारे प्रतिपोते रु.२५/- धोरण सन २०१४-१५ मध्ये सुरु ठेवावे.	सहकारी साखर कारखाने, वित्तीय संस्था/ बँका आणि साखर आयुक्तालय	संपुर्ण गाळप हंगाम २०१४-१५.

१२	राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत ऊसतोडणी यंत्रास अनुदान बाबत	योजनेमधील लाभार्थींना यंत्र किंमतीचे २५% किंवा रु.२५.०० लाख मर्यादेपर्यन्त अनुदान देण्याचा सद्याचा निर्णय कायम ठेवावा.	कृषि विभाग/ साखर आयुक्तालय/ साखर कारखाने आणि वित्तीय संस्था / बँका	संपुर्ण गाळप हंगाम २०१४-१५.
	महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ यांच्या सूचनांवर कार्यवाही :-			
१	पेट्रोलमध्ये १०% इथेनॉल मिसळणे बंधनकारक आहे.राज्यातील डिस्टीलरी व साखर कारखान्यांनी ३०% उत्पादन इथेनॉलसाठी राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात यावे.	सदर मुद्दयावर आवश्यक त्या कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करावी.	सहकार विभाग	आर्थिक वर्ष २०१४-१५
२	भाग विकास निधीच्या वापराबाबत शासन निर्णय १९८९ मध्ये उचित बदल करण्यात यावेत व रु.१०/- प्रमेट रक्कमेमध्ये वाढ व्हावी.	नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करावी.	सहकार विभाग	आर्थिक वर्ष २०१४-१५
३	केंद्र शासन पुरस्कृत गोदाम योजनेमध्ये समाविष्ट गोदाम बांधकाम मंजूरीसाठी बाहेरुन कर्ज उभारणी मर्यादा संपुष्टात आली असल्यास त्यास सहवीज निर्मिती आणि आसवनी प्रकल्प शुन्य प्रदुषण पातळीबाबतच्या प्रकल्पाप्रमाणे अट शिथील करण्यात यावी.	प्रचलित धोरणाप्रमाणे कार्यवाही करावी.	सहकार विभाग	आर्थिक वर्ष २०१४-१५
४	नवीन प्रकल्पासाठी ठेवी स्विकारताना मुदतपुर्व ठेवी परत करणे बंधनकारक असू नये.	विषय क्र.७ प्रमाणे कार्यवाही करावी.	सहकार विभाग	आर्थिक वर्ष २०१४-१५
	केंद्र शासनाशी संबंधीत मुद्दे:-			
	१:- SDF कर्ज मंजूरीबाबत केंद्र शासनाने दिलेल्या दि. ५ जुन. २०१४ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने केंद्राला विनंती करुन कर्ज पुरवठा पूर्ववत करणेबाबत. २:- केंद्र शासनाने साखरेच्या आयात व निर्यातीचे धोरण पुढील दहा वर्षासाठी निश्चित	सदर मुद्दयांवर राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे आवश्यक तो पाठपुरावा करण्यात यावा.	सहकार विभाग	आर्थिक वर्ष २०१४-१५

	करणेबाबत. ३:- कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी अनुदान देण्याचा केंद्र शासनाचा निर्णय सप्टेबर-२०१४ पर्यंत आहे. सदर कालावधी सप्टेबर-२०१५ पर्यंत वाढविण्यात यावा. ४:- पेट्रोलमध्ये १०% इथेनॉल मिश्रणाच्या केंद्र शासनाच्या निर्णयाची सक्तीने अंमलबजावणी करणे आणि तशी अधिसूचना निर्गमित करणे. ५:- अबकारी कर कर्ज २०१४ अन्वये मागिल तीन वर्षाऐवजी पाच वर्षे करापोटी भरणा केलेल्या रकमेऐवढे कर्ज मिळावे आणि तशी अधिसूचना निर्गमित करणे. ६:- आयात साखरेवरती केंद्र शासनाने ४०% आयात कर लावण्याचे घोषित केले आहे आणि तशी अधिसूचना निर्गमित करणे. ७:- सहकारी साखर कारखान्यांनी SDF/NCDC कडून घेतलेल्या कर्जांचे पुनर्गठन करणे.			
	८:- केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या CREP नॉर्मस् प्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मागणी मध्ये बँक गॅरंटीची अट शिथील करणे.	नॅशनल एनव्हायरमेंट इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुट (NEERI), नागपूर, द एनर्जी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुट (TERI), मुंबई, वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट (VSI), पुणे तसेच साखर कारखाने यांचे उपस्थितीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने आवश्यक ती चर्चा करुन अथवा आवश्यकता असल्यास चर्चासत्र आयोजीत करुन साखर कारखानदारी मधील यंत्रणा प्रदुषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न करावा तसेच सदरच्या प्रश्नावर कायमस्वरुपी मार्ग काढावा आणि याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.	महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ/ साखर आयुक्तालय	आर्थिक वर्ष २०१४-१५